# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/11/2023 (गुरूवार) दुपार


---

### अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
### पोलीस स्टेशन देवलापारची कारवाई

पोस्टे देवलापार अंतर्गत १० किमी अंतरावर मौजा सावरा शिवार येथे दिनांक १५/११/२०२३ चे ०८.१० वा. ते ०८.५५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन देवलापार हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना नमुद घटनास्थळी लाल रंगाचा महेन्द्र ५७५ डीआय कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम. एच.– ४०/बी. जे– ५५०९ चा चालक व मालक **आरोपी नामे– विनोद अमृत चौव्हान, वय ४२ वर्षे, रा. सावरा पोस्ट देवलापार ता. रामटेक** हा शासनाचा कर चुकवुन अवैध्यरित्या विनापरवाना गौण खनिज (रेती) ची नाल्यातुन चोरी करुन तो चोरटी वाहतुक करतांनी मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन ०१) महेन्द्र ५७५ डीआय कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच– ४०/ बी जे– ५५०९ किंमती ४,००,०००/–रु ०२) विना नंबरची लाल रंगाची ट्रॉली किंमती १,००,०००/–रु ज्यात अंदाजे ०१ (एक) ब्रास रेती किंमंती ५,०००/–रु असा एकुण ५,०५,०००/–रुपयाचा मूद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोशी क्रांतीचंद हराळ पोस्टे देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि सहकलम ४८ (८) जमिन महसुल अधिनीयम १९६६ कलम ५० मोटर वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक मडावी मो. नं. ७७५८८७६५३ हे करीत आहे.

### घरफोडीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस मौदा पोलीसांनी केले अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर लक्ष्मी नगर मौदा येथे दिनांक १६/११/२०२३ चे ००.१५ वा. दिनांक १६/११/२०२३ चे ००.४० वा. दरम्यान फीर्यादी नामे– उमेश रूपारावजी गभने वय ५९ वर्ष रा. लक्ष्मी नगर मौदा जि. नागपुर यांच्या घराशेजारी राहत असणारे रत्नाकर कावळे यांचे घर असुन मागील १ महिन्या अगोदर मातीखाये यांनी विकत घेतले आता त्या घरामध्ये कोणीही राहत नाही. दि १६.११.२०२३ चे १२.३० वा. दरम्यान फिर्यादी आपल्या घरी हजर असता फिर्यादीला लॉक साईडच्या घरच्या लॉक तोडण्याचा आवाज आला असता फिर्यादी आजुबाजचे लोक यांना कॉल करून बोलवले सर्व जमले असता त्या घरातील लॉक हे तुटुन खाली पडले दिसले व आतमधिल लाइट सुरू दिसले आम्ही आरडा ओरड केले असता आणखी घराजवळील लोक जमले आरोपी नामे– **चंद्रशेखर रामटेके वय ४० वर्ष रा. सौदळ रा सडक अर्जीन डुग्नीपार गोंदिया** हा घरातुन पळुन जात असता वॉल कंपाउड येथुन कुदला असता त्याला चेहऱ्याला रक्त लागले त्याला पकडुन ठेवले असता लोंकांनि त्याला मारहाण करीत असता मौदा पोलीस यांना कॉल केले पालीस आले व आरोपीला मार लागला असता पुढील उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय येथे उपचार कामा करीता नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अस्लत मो. नं. ८६६८८१६०४९ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर